# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव

**(आस्थापना शाखा)**

**दुरध्वनी क्र.** 0257-2220152 **फॅक्स क्र.** 0257-2220500 **ई-मेल :-** est.jalgaon@gmail.com

--------------------------------------------0000000000--------------------------------------

क्र. आस्था/मावक/कावि/2016/1/9/66
दिनांक :- 26/09/2016.

**प्रति,**

सोबतच्या यादीतील उमेदवार

--------------------------------

--------------------------------

**विषय :-** सरळसेवा भरती प्रक्रिया सन 2016
वाहनचालक पदाच्या कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहणेबाबत.

जिल्हा निवड समिती, जळगाव मार्फत जिल्हाधिकारी जळगाव यांचे आस्थापनेवरील सरळसेवा भरती प्रक्रीयेअंतर्गत वाहनचालकाचे रिक्त पदे भरणेसाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर मागविण्यात आले होते. त्यानुसार पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा दि. 04/09/2016 रोजी घेणेत आलेली आहे.

सदर लेखी परीक्षेत उत्तीर्ण होऊन कागदपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची यादी दि. 26/09/2016 रोजी या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून सदर यादीत आपले नाव समाविष्ट आहे. कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी **दि.05/10/2016 रोजी सकाळी ठिक 10.00 वाजता, नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव** येथे करण्यात येणार आहे.

प्रस्तुत कामी आपणास कळविण्यात येते की, आपण खालील नमुद केलेप्रमाणे सर्व मुळ कागदपत्र / प्रमाणपत्र त्यांच्या साक्षांकित छायाप्रतिंच्या 2 संचांसह उक्त नमुद केलेल्या ठिकाणी व वेळी स्वखर्चाने न चुकता उपस्थित रहावे. आपण विहित वेळी उपस्थित न राहिल्यास आपणास सदर प्रकरणी स्वारस्य नसल्याचे गृहित धरुन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

1. संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मुळ अर्जाची प्रिन्ट-आऊट.
2. भारतीय स्टेट बँकेमध्ये परीक्षा फी भरलेल्या चलनाची मुळ प्रत.
3. भारतीय नागरीक असल्याबाबतचे प्रमाणपत्राची (Nationality) मूळ प्रत.
4. महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्राची (Domicile) मुळ प्रत.
5. कोणत्याही मान्यता प्राप्त शाळेतून इयत्ता ४ थी ची परीक्षा उत्तीर्ण असलेबाबतचे गुणपत्रक.
6. Motor Vehicles Act, १९३९ नुसार Heavy Vehicle or a motor car or a jeep चालविणेबाबतचा वैध वाहन परवाना.
7. मोटार वाहन चालविणेबाबतचे कमीत कमी ३ वर्षाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक.
8. शाळा सोडल्याचा दाखल्याची (L. C. / T. C.) मुळ प्रत.

9. सामाजिक आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांनी (मागासवर्गीय) मुळ जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास मुळ जात वैधता प्रमाणपत्र.
10. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अ. जाती, अ. जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) मधील कलम 4 (2) (दोन) मधील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व, विजा-अ, भज-ब. भज-क, भज-ड, विमाप्र व इमाव ह्या प्रवर्गांना लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-10 /2006/प्र.क्र.15/मावक-5 दि.30/06/2006 सोबतच्या सुधारित नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी 31 मार्च 2017 पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रीमिलेयर) मुळ प्रमाणपत्र.
11. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूबांचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील तरतुदीनुसार गट अ ते ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणुन विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.
12. छायाचित्र ओळख पुरावा (ओळखपत्र / Photo Identity Card) (आधार कार्ड/ राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स इ.)
13. निवडयादी व प्रतिक्षायादी मध्ये निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीनुसार दुरुस्ती करणे किंवा रद्द करणे याचे सर्व अधिकारी अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी जळगाव यांना राहतील.
14. उक्त सर्व कागदपत्रांची पूर्ण पडताळणी तसेच जाहिरातीत नमुद सर्व निकषांची पुर्तता झाल्याशिवाय उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

अध्यक्ष जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी जळगाव

# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव

## सरळसेवा भरती प्रक्रिया-2016

## फक्त कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांची यादी

## पदाचे नाव :- वाहनचालक

| अ.क्र. | बैठक क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | समांतर आरक्षण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1201324 | BHUSHAN HANUMAN PAGAR | OBC | -- | 88 |
| 2 | 1201207 | RAHUL RAMRAO PATIL | OBC | -- | 86 |
| 3 | 1201289 | VISHNU PANDURANG TAYDE | OBC | -- | 86 |
| 4 | 1201024 | JITENDRA SHAMRAO BORATE | OBC | -- | 84 |
| 5 | 1201413 | ASHOK SHALIGRAM CHAUDHARI | OBC | -- | 84 |

**सूचना :-**

1) सदर यादी कागदपत्र तपासणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे.
2) सदर यादीत नाव समाविष्ट असलेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी **बुधवार, दि.05/10/2016 रोजी सकाळी 10.00 वाजता, नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव** येथे करण्यात येईल.
3) मुळ कागदपत्र तपासणीच्या वेळी विहित अर्हता धरण करीत नसलेल्या उमेदवारांची निवड केली जाणार नाही.
4) कागदपत्रांच्या तपासणीनंतर अर्हता प्राप्त उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे अंतिम निवड यादी जाहीर करण्यात येईल.

**ठिकाण** :- जळगाव
**दिनांक** :- 26/09/2016.

**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी जळगाव**

COLLECTOR JALGAON
जिल्हाधिकारी जळगांव